## प्रेस नोट दिनांक १४/०९/२०१७

## जयपुर, राजस्थान येथून सैराट जोडी प्रमाणे धूम ठोकून पळून आलेल्या प्रेमी युगलास गुन्हे शाखा,युनिट-१, पुणे शहरच्या टिमने घेतले ताब्यात

चौमू पोलीस ठाणा, जि. जयपूर, राजस्थान येथे दाखल असलेला गु.र.नं. ४०८/२०१७ भादविक. ३६३, ३६६ मधील आरोपी नामे सुरज भान सिंह, पुत्र मनोहर सिंह, वय १९ वर्षे, पत्ता – रा. छोटी डुंगरी, रेनवाल, जयपुर, राजस्थान व सोबत एक अल्पवयीन मुलगी हे नमुद गुन्हयात मागील एक महिन्यापासून फरार होते. तसेच मुलगा व मुलगीचे आई वडील मागील एक महिन्यापासून खूप चिंताग्रस्त होते व त्यांचा सर्व तो परी प्रयत्न करून शोध घेत होते. सदर मुलगा मुलगी हे मुंबईत असतील म्हणून त्यांनी मोठया प्रमाणात प्रयत्न करून मुला मुलीचा शोध घेत होते. तसेच त्यांचे फोटो गुवाहटी (आसाम), दिल्ली, दादर (मुंबई) या ठिकाणी रेल्वे स्टेशनवर लावण्यात आलेले होते. परंतू त्यांना व राजस्थान पोलीसांना यश आले नव्हते.

परंतू युनिट १, गुन्हे शाखेकडील पोलीस नाईक इरफान मोमीन यांना त्यांच्या खास बातमी दारामार्फत गुप्त माहिती मिळाली होती की, उपरोक्त नमुद सैराट जोडी ही पुण्यामध्ये आहे. त्याप्रमाणे इरफान मोमीन यांनी मा. व.पो.निरी. श्री नितीन भोसले पाटील यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे मुलगा व मुलगी यांचा शिताफीने शोध घेवून त्या दोघांना ताब्यात घेतले आहे. तसेच चौमू पोलीस ठाणा, जि. जयपूर, राजस्थानचे प्रभारी अधिकारी यांचे बरोबर फोनवर संपर्क करून सदर बाबत माहिती दिली असता, त्यांनी तात्काळ त्यांचे पोलीस सटेशनचे मपोउपनिरी इन्दू शर्मा, व कॉन्स्टेबल जगदीश सिंह यांना पुणे येथे नमुद गुन्हयाच्या तपासकामी पाठविले.

आज रोजी जयपुर, राजस्थान येथून सैराट जोडी प्रमाणे धूम ठोकून पळून आलेल्या प्रेमी युगलांना राजस्थान पोलीसच्या मपोउपनिरी इन्दू शर्मा यांचे ताब्यात देण्यात आले आहे. सदरच्या वरील नमुद कामगिरी बाबत वरीष्ठ अधिकाऱ्यांकडून चांगल्या प्रमाणात शाबासकी देण्यात आली आहे, तसेच राजस्थान पोलीस कडून पुणे पोलीसांचे व युनिट १, गुन्हे शाखेच्या टिमचे कौतुक करण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो., पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री सुरेश भोसले सो., सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पोलीस उप-निरीक्षक, दिनेश पाटील, हर्षल कदम, पो.ना. ईरफान मोमीन, पो.हवा. रिजवान जिनेडी, श्रीकांत वाघवले, तुषार खडके, स.पो.फौज. राजाराम सुर्वे, विजयसिंग वसावे, पो.हवा. राजु पवार, मेहबुब मोकाशी, अशोक माने, उमेश काटे, प्रकाश लोखंडे, सुभाष पिंगळे, सुरेंद्र आढाव, इम्रान शेख, प्रशांत गायकवाड, गजानन सोनुने, सचिन जाधव यांनी केली आहे.

पोलीस उप आयुक्त,
गुन्हे, पुणे शहर